दिनांक - 11/07/2023 रोजीचा प्रशासकीय ठराव क्र. 31

विषय :- विटा नगरपरिषदेसाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानाअंतर्गत विटा नगरपालिकेस 01 अग्निशमन वाहन खरेदी करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ :-1)मा.मुख्याधिकारी यांनी वाहन विभाग प्रमुख यांची दि.21/11/2022 रोजी मंजुर केलेली टिपणी.

2) शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.अशस- 407/360/ प्र.क्र.29/ नवी-20,दि. 31 ऑगस्ट, 2009

3) शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. अशसे- 2012/ प्र.क्र.69/नवि-04, दि12 मार्च 2021.

4) महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांचे क्रमांक मअसे 2021/32/516 यांचे दिनांक- 06/05/2021 रोजीचे निर्देश

विटा नगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडे वाहन क्रमांक MH 10 P1008 या क्रमांक चे एकूण 1 फायर टेंडर्स आहे. सदरचा फायर टेंडर्स दिनांक 26/06/2007 रोजी खरेदी केला होता. त्यांची मुदत 25/06/2022 पर्यंत होती. सदरच्या वाहनास खरेदी करून 15 वर्षे 4 महिने झाले आहेत. सदरच्या फायर टेंडर्सचे 62627 किमी रनिंग झाले असून संदर्भ क्रमांक 4 मुद्दा क्रमांक 4 विहित पद्धत अवलंबून निकामी करणे बाबत निर्देश देण्यात आले आहे. नुसार नागरी स्वराज्य संस्थांच्या अग्निशामन सेवेतील जी वाहने 10 वर्षापूर्वीची आहेत किंवा ज्या अग्निशामन वाहनांचा 5000 तास ऑपरेशनल वापर झालेला आहे अशी वाहने विहीत पध्दत अवलंबून निकामी करणेबाबत निर्देश देणेत आले आहेत.

सदरच्या वाहनास वारंवार दुरुस्तीचा खर्च येत आहे. तसेच गाडीची कार्यक्षमता देखील कमी झालेली आहे. गाडीचे जॉईट देखील वारंवार निकामी होत आहेत. गाडीवरील पाण्याची टाकीला गंज लागलेला असल्याने वारंवार टाकी लिकेज होत आहे. यानुसार सदर वाहन उपयोगात आणणे आर्थिक दृष्ट्या किफायतशीर होणार नाही. नागरी स्वराज्य संस्थांच्या अग्निशामन सेवेतील जी वाहने दहा वर्षांपूर्वीची आहेत किंवा ज्या अग्निशामन वाहनांचा 5000 तास ऑपरेशनल वापर झालेला आहे अशी वाहने विहित पद्धत अवलंबून निकामी करून या अग्निशमन वाहनांच्या बदल्यात नवीन अग्निशमन वाहन खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत शासन अनुदान देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

पान नं. 2 वर

तरी सदर वाहन निर्लेखित करून नवीन वाहन खरेदी करणेकामी महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयास प्रस्ताव सादर करणेत यावा. याकामी 10% हिश्याची रक्कम नगरपरिषद फंडातून अदा करणेत यावी. तरी विटा नगरपरिषदेसाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानाअंतर्गत विटा नगरपालिकेस 01 अग्निशमन वाहन खरेदी करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 11/07/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 32

विषय – विटा नगरपरिषदेकडील सन 2023-2024 या वित्तीय वर्षाकरीता स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधराचे अनुषंगाने शहरामध्ये विविध ठिकाणच्या पिण्याच्या पाण्याच्या टाक्या, शौचालय, सार्वजनिक ठिकाणचे रंगकाम करणे, अक्षरे लिहणे, चित्रे काढणे, आवश्यक ठिकाणी पायाड उभारणे, न.पा.मालकीच्या इमारतीस व इतर ठिकाणी रंगरंगोटी करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी आरोग्य निरीक्षक यांची दिनांक 03/04/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी

विटा शहराने मागील 5 वर्षामध्ये स्वच्छ सर्वेक्षणमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. तसेच स्वच्छ सर्वेक्षण 2021 मध्ये संपूर्ण देशामध्ये प्रथम क्रमांक व स्वच्छ सर्वेक्षण 2022 मध्ये पश्चिम भारतात दुसरा क्रमांक प्राप्त झाला आहे.

स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा अभियान चे अनुषंगाने शहरामध्ये सौंदर्यीकरण होणेसाठी विविध भागामध्ये रंगरंगोटी करणे आवश्यक आहे. शहरामध्ये रंगरंगोटी केलेने सौंदर्यीकरणामध्ये भर पडणार आहे. त्याचा फायदा स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधराच्या कामात होणार आहे. रंगरगोटी करणेकामी अंदाजे वार्षिक र.रू.10,00,000/- इतका खर्च येणार आहे.

तरी विटा शहरामध्ये स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधराचे अनुषंगाने शहरामध्ये रंगरंगोटी सन 2018-2019 स्वच्छ सर्वेक्षणमध्ये उच्चतम कामगिरी करणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहनात्मक बक्षीस रक्कम अंतर्गत करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 11 /07/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 33

विषय – विटा नगरपरिषदेकडील घनकचरा व्यवस्थापन करीता आवश्यक वाहने खरेदी करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1)मा.मुख्याधिकारी यांनी भांडार विभाग यांची दिनांक 10/07/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.
2)नगरविकास सिभागाकडील शासन निर्णय क्र. स्वमअ- २०२३/प्र.क्र.३८(२)/नावि-३४ दि.२०/०३/२०२३

देशातील सर्व शहरांमधील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे, याकरिता केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान (नागरी)” च्या धर्तीवर “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” ची अंमलबजावणी सुरु आहे. याअंतर्गत विविध शहरांना स्वच्छ महाराष्ट्र अभियानाअंतर्गत विविध प्रकल्पांकरिता निधी वितरीत करण्यात आला होता. परंतु जे प्रकल्प पूर्ण होऊ शकत नाहीत अशाप्रकल्पांकरिता देण्यात आलेला निधी परत घेऊन त्याऐवजी घनकचरा व्यवस्थापनाकरिता आवश्यक वाहनेखरेदी करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव राज्य अभियान संचालक यांच्यामार्फत मा. मुख्य सचिव यांच्याअध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या दि.०३/०३/२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यतेकरिता सादरकरण्यात आला होता. सदर प्रस्तावास उच्चाधिकार समितीने त्याच बैठकीमध्ये मान्यता दिली आहे.

सदर संदर्भीय शासन निर्णयानुसार शहराना घनकचरा व्यवस्थापनाकरिता आवश्यक वाहने खरेदीकरण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. विटा शहरासाठी खालील प्रमाणे वाहन व मशीन खरेदी करिता रक्कम रुपये ९८,००,०००/- इतका निधी मंजुर केला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र | तपशील | किंमतरु | मंजुर नग/ संख्या | एकूण होणारी किंमत |
|---|---|---|---|---|
| A | १ | २ | ३ | ४ |
| १ | RefusedCompactor | ३०,००,००० | १ | ३०,००,००० |
| २ | Tractor | ३,८०,००० | २ | ७,६०,००० |
| ३ | Bailing Machine | ४,००,००० | २ | ८,००,००० |
| ४ | Four Wheel Auto Tipper | १०,००,००० | ४ | ४०,००,००० |
| ५ | Hand Cart | १०,००० | २४ | २,४०,००० |
| ६ | Three Wheeler Auto Tipper | ५,००,००० | २ | १०,००,००० |
| | | | एकूण रक्कम | ९८,००,०००/- |

पा नं. 2 वर

परंतू संदर्भीय नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. स्वमअ-२०२३/प्र.क्र.३८(२)/नावि-३४ दि. २०/०३/२०२३ मधील नमूद रीफ्युस्ड कॉम्पॅक्टर -नग-१ हे सध्या नगरपरिषदेकडे उपलब्ध आहे. तसेच नगरपरिषदेमार्फत १००% घरोघरी जाऊन कचरा गोळा केला जातो. विटा नगरपरिषदही बिन फ्री सिटी असल्याने शहरात मोठ्या कुंड्या नाहीत सबब रीफ्युस्ड कॉम्पॅक्टरची नगरपरिषदेस आवश्यकता नाही. याऐवजी दुसरे वाहन मंजूर करणेबाबत कार्यवाही करणेबाबतचे पत्र नगरपरिषदेने जावक क्रमांक 2023/05/10 दिनांक 358ने शासनासपाठविले आहे .. शासन मंजुरी प्राप्त झालेनंतर उचित कार्यवाही करणेत येईल.तसेच याबाबत पुन्हा दिनांक 24/05/2023 रोजी जावक क्रमांक ४४३ ने पत्र पाठविण्यात आले आहे.

तरी वरील शासन निर्णयातील रीफ्युस्ड कॉम्पॅक्टर सोडून बाकीची वाहने खरेदी करण्यास मान्यता ठराव क्र १७दिनांक 11/05/2023 रोजीच्या प्रशासकीय ठरावाने प्राप्त आहे.

नगर परिषदेने दिनांक 24/05/2023 रोजी जावक क्रमांक ४४३ ने रीफ्युस्ड कॉम्पॅक्टर सोडून बाकीची वाहने खरेदी करण्यास मान्यता मिळण्यासंबंधीच्या पाठविण्यात आलेल्या पत्रास नगरपरिषद स्तरावर स्वच्छते संबंधीच्या कामास आवश्यक लागणारी वाहने खरेदी करण्याबाबत तोंडी सूचना दिनांक14/06/2023 रोजीच्याबैठकीत प्राप्त आहेत.वाढती लोकसंख्या व त्यानुसार आवश्यक वाहनाचा विचार केला असता विटा शहराचा घनकचरा व्यवस्थापनासाठी कचरा उठाव करणे करीत सध्याची उपलब्ध वाहने अपुरी पडू शकतात तसेच स्वच्छ महाराष्ट्र अभियान २ मधून भविष्यात वाहनाकरिता निधी उपलब्ध होणार नसले बाबत दिनांक 14/06/2023 रोजीच्या बैठकीत सांगितले असल्यामुळे संदर्भीय शासन निर्णयामध्ये नमूद वाहने खरेदी करणे आवश्यक वाटते.

सदर खरेदी ही शासनाच्या GEM पोर्टल वरून खरेदी करणेबाबत वरील नमूद संदर्भानूसार आदेश प्राप्त आहेत. सदर वाहनांची किंमत खरेदी वेळी मंजूर किंमती पेक्षा जास्त असल्यास येणारा खर्च हा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी करणेबाबत कळविले आहे . तरी सदर खरेदी वेळी मंजूर किंमती पेक्षा जादा येणारा खर्च नगरपरिषद किंवा इतर अनुज्ञेय अनुदानातून करणेत यावा.

तरी स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) मधून प्राप्त निधी मधून रीफ्युस्ड कॉम्पॅक्टर ऐवजी तीन नग घंटागाड्या खरेदी करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 11/07/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 34

विषय – स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना) 2.0 अंतर्गत सामुदायिक शौचालय (CT) अखर्चित निधीमधून महात्मा गांधी शाळेनजीक, साळशिंगे रोड येथील जुने सामुदायिक शौचालय (CT) पाडून त्या ठिकाणी नविन सामुदायिक शौचालय बांधणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- - मा.मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दिनांक 07/07/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

संदर्भः 1. राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांचे जा.क्र./ स्वम 2.0/ उ.प्र. /196 /23-24 दि. 24.05.2023 रोजीचे पत्र

2. आदर्श इंन्स्टीटयुट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च सेंटर, विटा यांचेकडील Ref. No.AITRC / OL / 2022-23 / 1020 दि. 06/07/2023 रोजीचा स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) अंतर्गत पुणे विभागातील महानगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायती यांना वैयक्तिक शौचालय (IHHL) सामुदायिक शौचालय (CT), घनकचरा व्यवस्थापन (SWM), माहिती शिक्षण व संवाद (IEC) व क्षमता बांधणी (CB) या घटकाअंतर्गत निधी वितरीत करण्यात आला होता. तथापि स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) अंतर्गत मोठ्या प्रमाणात निधी अखर्चित असल्याचे निदर्शनास आले आहे. सदरील अखर्चित निधी वेळेत खर्च करणेचे आहे.

सदर संदर्भ क्र 1 नुसार विटा शहराचा CT/ PT बांधण्यासाठी देण्यात आलेला रक्कम रु. 22,92,680/- इतका अखर्चित निधी आहे. तरी त्या अखर्चित निधीमधून एक सामुदायिक शौचालय (CT) महात्मा गांधी शाळे नजीक, साळशिंगे रोड येथील 30 वर्षांपूर्वीचे जुने सामुदायिक शौचालय (CT) पाडून त्या ठिकाणी नविन सामुदायिक शौचालय बांधणे आवश्यक आहे.

सध्या शहरात 10 सामुदायिक व 8 सार्वजनिक शौचालय आहेत. यापैकी सर्वाधिक वापर महात्मा गांधी शाळे नजीकच्या शौचालायाचा होतो. सदर परिसरातील जवळपास 100 पेक्षा अधिक नागरिक या शौचालयाचा वापर दैनंदिन करतात. सदर परिसरातील नागरिकांकडे जागेची उपलब्धता नसल्याने ते वैयक्तिक शौचालयाच्या अनुदानाचा लाभ घेऊ शकत नाही.

पान नं. 2 वर

सदरचे शौचालय है सन 1990 च्या आधी बांधले असून सदर शौचालयाची नगरपरिषद मिळकत नोंदीमध्ये 1991 साली नोंद घेण्यात आली आहे. सदरचे शौचालय बांधकाम हे लोड बेअरिंगचे आहे.

महात्मा गांधी शाळेनजीक साळशिंगे रोड येथील सामुदायिक शौचालयाचे स्ट्रक्चरल ऑडिट आदर्श इंन्स्टीटयुट ऑफ टेकनॉलॉजी अॅन्ड रिसर्च सेंटर विटा यांच्याकडून करून घेतले आहे. संदर्भ क्र. 2 नुसार सदर अहवाल दि.06/07/2023 रोजी विटा नगरपरिषदेस प्राप्त झाला आहे. सदर अहवाला अन्वये सदरचे शौचालय स्ट्रक्चरली अनफिट आहे. त्यामुळे सदरचे शौचालय पाडणे आवश्यक आहे. असे अहवालात नमूद आहे. तसेच ते शौचालय वारंवार चोकअप होत असून त्याचे आउटलेट मधील पाणी बाहेर जाण्याची सोय नाही. तसेच स्ट्रक्चरल समस्या, खराब वायुवीजन, दुर्गंधी, अपुरी स्वच्छता सुविधा, शौचालय सुस्थितीत नसले कारणामुळे नागरिकांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेसाठी धोका निर्माण होऊ शकतो. या कारणांमुळे महात्मा गांधी शाळेनजीक साळ रोड येथील सामुदायिक शौचालय पाडणे आवश्यक आहे.

तरी महात्मा गांधी शाळे नजीक, साळशिंगे रोड येथील 30 वर्षांपूर्वीचे जुने सामुदायिक शौचालय (CT) पाडून त्या ठिकाणी नविन सामुदायिक शौचालय बांधणेचे अंदाजपत्रक तयार केले असून त्याची किंमत रकम रु. 33,74,596/- इतकी होत आहे. सदर संदर्भ क्र 1 नुसार विटा शहराचा CT/ PT बांधण्यासाठी देण्यात आलेला रुपये 22,92,680/- इतका अखर्चित निधी आहे. या अखर्चित निधीतून महात्मा गांधी शाळे नजीक, साळशिंगे रोड येथील जुने सामुदायिक शौचालय (CT) पाडून त्या ठिकाणी नविन सामुदायिक शौचालय (CT) बांधणेस मंजुरी देत आहे. याकामी येणारा अतिरिक्त खर्च हा स्वच्छ सर्वेक्षण प्रोत्साहनात्मक बक्षिस रक्कम / नगरपरिषद फंडातुन / इतर अनुज्ञेय अनुदानातुन करणेत यावा. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक - 11/07/2023 रोजीचा प्रशासकीय ठराव क्र. 35

विषय– केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 योजनेअंतर्गत सुधारीत पाणी पुरवठा योजनेचा डि. पी.आर. तयार करणेकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नगरपरिषदेमार्फत नेमणूक करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – 1)मा.मुख्याधिकारी यांनी इंजिनियर यांची दि. 05/06/2023 रोजी मंजुर केलेली टिपणी.

2) महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. अमृत 2022/प्र.क्र. 141/नवि-33दि. 14/07/2022

3) महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील परिपत्रक क्र. अमृत 2022/प्र.क्र.203/नवि-33दि. 16/07/2022

4) शासन निर्णय क्र. संकिर्ण/2018/प्र.क्र.54/नवि-16 मंत्रालय, मुंबई दि. 04/06/2018

5) कार्यकारी अभियंता (प्र), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग सांगली यांचेकडील जा.क्रं.लेखा-2/1369/2023 दिनांक 06/07/2023

केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 योजनेअंतर्गत सुधारीत पाणी पुरवठा योजनेचा डि.पी.आर. व अंदाजपत्रक तयार करणेकामी प्रशासकीय ठराव नं.17 दि.07/07/2022 ने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, सांगली यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेत आलेली होती. अद्याप महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, सांगली यांचा अद्याप पाणी पुरवठा योजनेचा डि.पी.आर व अंदाजपत्रक तयार केलेले नाही. तसेच मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, सांगली यांनी दि.14/12/2022 ने अभियंता व कर्मचारी संख्या अपुरी असलेने सदर योजनेचा डि.पी.आर. व अंदाजपत्रक करणे शक्य होणार नाही. असे कळविले आहे.

सदरची योजना हि अमृत 2.0 योजनेअंतर्गत करावयाची असून वारंवार नगरविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडून पाणी पुरवठा योजनेचा डि.पी.आर व अंदाजपत्रक तयार करून सादर करणे बाबत नगरपरिषदेस सुचना दिलेल्या आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सांगली मार्फत सदर योजनेचे डि.पी.आर व अंदाजपत्रक अद्याप सादर केले गेले नसल्याने सदर योजनेचा डि.पी.आर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, सांगली या कार्यालय ऐवजी नगरपरिषदेमार्फत करणे योग्य होईल व योजनेस होणारा विलंब टाळता येईल.

पान नं. 2 वर

तरी महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन परिपत्रक क्र. अमृत – 2022 / प्र. क्र. 203 / नवि - 33 मंत्रालय मुंबई यांचे दिनांक - 16/07/2022 चे नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून एकूण 16 संस्थांची नामिका तयार केलेली आहे. त्यापैकी कोणत्याही एका संस्थेची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून निवड करू शकतो असे सुचित केलेले आहे. त्यामध्ये जियो स्पेशियल स्टुडिओ एल. एल. पी. पुणे हि कंपनी समाविष्ठ आहे. याबाबत संदर्भ क्रं. 5 अन्वये मा.कार्यकारी अभियंता (प्र), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग सांगली यांचेकडील जा.क्रं.लेखा - 2/1369/2023 दिनांक-06/07/2023 ने मार्गदर्शन दिलेले आहे. सदर पत्रामध्ये महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील परिपत्रक क्र. अमृत 2022/प्र.क्र.203 /नवि-33दि. 16/07/2022 नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची एकूण 16 संस्थांची नावे तयार असून यापैकी कोणत्याही नामिकाकडून डि.पी.आर तयार करावयाचे झालेस निविदा प्रक्रिया करणे आवश्यक नाही असे नमूद केले आहे.

तरी महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन परिपत्रक क्र.अमृत – 2022/ प्र.क्र. 2023/नवि-33 दि.16/09/2022 चे परिपत्रकाप्रमाणे पाणी पुरवठा योजनेचा डि.पी.आर तयार करणेसाठी जियो स्पेशियल स्टुडिओ एल.एल.पी. या कंपनीची एजन्सी नेमणेस मंजूरी देणेत येत आहे. याची होणारी फि नगगरपरिषद फंडातून / इतर अनुज्ञेय अनुदानातून / व्याजाच्या रक्कमेतून अदा करणेत यावी. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 11/07/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 36

विषय – विटा नगरपरिषद मालकीचे सि.स.न. 7. व. 8 मधिल तळ मजला गाळा नंबर 4 परत घेणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी मिळकत व्यवस्थापक यांची दिनांक 07/07/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद मालकीचे सि.स.न. 7 व 8 मधिल तळ मजला गाळा नंबर 4 श्री. सुभाष मानसिंग नागरे रा. विटा यानी जाहीर लिलावाने गाळा घेतला होता. त्यासाठी त्यांनी कि. पा. नं. 2724 दि.27/10/2015 ने गाळा भाडे अनामत रक्कम रुपये 5,95,000/- द कि.पा.नं. एफआय 04/1674 दि.05/11/2015 ने गाळा भाडे अनामत रक्कम रुपये 5,95,000/- अशी एकूण रक्कम रुपये 11,90,000/- इतकी रक्कम नपा फंडात जमा केली आहे. अर्जदार यांनी त्यांच्या वैयक्तिक अडचणी मुळे सदरचा दुकान गाळा येथून पुढे वापरणे अवघड झाले आहे. तसेच सदरील गाळयाची मुदत संपली असून सदर दुकान गाळा नगरपरिषेदेस परत करून गाळे भाडे अनामत रक्कम परत मिळणेबाबत दि. 20/03/2023 रोजीच्या प्राप्त झालेल्या अजनि विनंती केली आहे. अर्जदार यांनी सन 2022 -2023 या वित्तीय वर्षातील गाळेभाडे व संकलित कराची रक्कम नपा फंडात जमा केली आहे. त्याच्या पावत्या अर्जासोबात सादर केल्या आहेत. तसेच सन 2023- 2024 या वित्तीय वर्षातील गाळेभाडे व संकलित कराची आकारणी जाहीर लिलाव होईपर्यंत थांबविणे व अनामत रक्कम परत करणेबाबत विनंती केली आहे.तरी सन 2023- 2024 या वित्तीय वर्षातील गाळेभाडे व संकलित कराची आकारणी जाहीर लिलाव होईपर्यंत थांबविणे व अनामत रक्कम परत करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 11/07/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 37

विषय – विटा नगरपरिषदेकडील सन 2023-2024 या वित्तीय वर्षाकरीता संगणक विभागाकडील संगणक सर्व्हर नेटवर्कींग देखभाल दुरूस्ती,संगणकीय साहित्य,CCTV बसविणे बॅटरी पुरविणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी संगणक अंभियंता यांची दिनांक 29/06/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेकडील सन 2023-2024 या वित्तीय वर्षाकरीता संगणक विभागाकडील संगणक सर्व्हर नेटवर्कींग देखभाल दुरूस्ती,संगणकीय साहित्य,CCTV बसविणे बॅटरी पुरविणेकामी खालील ई निविदा दाखल आहेत.

1) मलिक इलेक्ट्रीकल्स

2) फोकस सिस्टीम (अर्जुन सुखदेव गायकवाड)

उपरोक्त ई निविदापैकी फोकस सिस्टीम (अर्जुन सुखदेव गायकवाड) यांचे निविदेतील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 11/07/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 38

विषय – विटा नगरपरिषदेकडील सन 2023-2024 या वित्तीय वर्षाकरीता नगरपरिषद हद्दीतील ठिकठिकाणी विविध आकाराची सिमेंट पाईप खरेदी करणे व बसविणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी अंभियंता यांची दिनांक 04/07/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेकडील सन 2023-2024 या वित्तीय वर्षाकरीता नगरपरिषद हद्दीतील ठिकठिकाणी विविध आकाराची सिमेंट पाईप खरेदी करणे व बसविणेकामी खालील ई निविदा दाखल आहेत.

1) रोहित राजकुमार सुर्यंवशी
2) कुलदिप कुंडलिक भिंगारदेवे
3) सुहेल सलिम तांबोळी

उपरोक्त ई निविदापैकी रोहित राजकुमार सुर्यंवशी यांचे निविदेतील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 11/07/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 39

विषय – विटा नगरपरिषदेकडील सन 2023-2024 या वित्तीय वर्षाकरीता नगरपरिषद हद्दीतील डांबरी रस्त्यावर पार्किंगसाठी पांढरे पट्टे मारणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी अंभियंता यांची दिनांक 04/07/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेकडील सन 2023-2024 या वित्तीय वर्षाकरीता नगरपरिषद हद्दीतील डांबरी रस्त्यावर पार्किंगसाठी पांढरे पट्टे मारणेकामी खालील ई निविदा दाखल आहेत.

1) रोहित राजकुमार सुर्यंवशी
2) कुलदिप कुंडलिक भिंगारदेवे
3) सुहेल सलिम तांबोळी

उपरोक्त ई निविदापैकी रोहित राजकुमार सुर्यंवशी यांचे निविदेतील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 11/07/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 40

विषय – विटा नगरपरिषदेकडील सन 2023-2024 या वित्तीय वर्षाकरीता नगरपरिषद हद्दीतील ठिकठिकाणी मुरूम व खडी पुरवठा करणे व खड्डे डांबराने मुजविणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी अंभियंता यांची दिनांक 04/07/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेकडील सन 2023-2024 या वित्तीय वर्षाकरीता नगरपरिषद हद्दीतील ठिकठिकाणी मुरूम व खडी पुरवठा करणे व खड्डे डांबराने मुजविणेकामी खालील ई निविदा दाखल आहेत.

1) सुहेल सलिम तांबोळी
2) कुलदिप कुंडलिक भिंगारदेवे
3) रोहित राजकुमार सुर्यंवशी

उपरोक्त ई निविदापैकी सुहेल सलिम तांबोळी यांचे निविदेतील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 11/07/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 41

विषय – विटा नगरपरिषदेकडील सन 2023-2024 या वित्तीय वर्षाकरीता नगरपरिषद हद्दीतील ठिकठिकाणचे गटर दुरूस्त करणे व इतर अनुषंगिक कामे करणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी अंभियंता यांची दिनांक 04/07/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेकडील सन 2023-2024 या वित्तीय वर्षाकरीता नगरपरिषद हद्दीतील ठिकठिकाणचे गटर दुरूस्त करणे व इतर अनुषंगिक कामे करणेकामी खालील ई निविदा दाखल आहेत.

1) सुहेल सलिम तांबोळी
2) कुलदिप कुंडलिक भिंगारदेवे
3) रोहित राजकुमार सुर्यंवशी

उपरोक्त ई निविदापैकी सुहेल सलिम तांबोळी यांचे निविदेतील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 11/07/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 42

विषय – विटा नगरपरिषदेकडील सन 2023-2024 या वित्तीय वर्षाकरीता नगरपरिषद हद्दीतील सार्वजनिक शौचालयाची भांडी, खिडक्या व दरवाजे दुरूस्त करणे,टाईल्स दुरूस्त करणे, पाईप दुरूस्त करणे, चेंबर दुरूस्त करणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी अंभियंता यांची दिनांक 04/07/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेकडील सन 2023-2024 या वित्तीय वर्षाकरीता नगरपरिषद हद्दीतील सार्वजनिक शौचालयाची भांडी, खिडक्या व दरवाजे दुरूस्त करणे,टाईल्स दुरूस्त करणे, पाईप दुरूस्त करणे, चेंबर दुरूस्त करणेकामी खालील ई निविदा दाखल आहेत.

1) कुलदिप कुंडलिक भिंगारदेवे
2) सुहेल सलिम तांबोळी
3) रोहित राजकुमार सुर्यवंशी

उपरोक्त ई निविदापैकी कुलदिप कुंडलिक भिंगारदेवे यांचे निविदेतील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक  11/07/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 43

विषय – विटा नगरपरिषद आरोग्य विभागासाठी जे.सी.बी, पोकलॅड, फरांडी ट्रॅक्टर, साधा ट्रॅक्टर ट्रॉलिसह , रोड रोलर वाहन भाडयाने पुरविणेकामी दाखल दरपत्रकावर निर्णय घेणे.

संदर्भ-  मा.मुख्याधिकारी यांनी आरोग्य निरिक्षक यांची दिनांक 10/07/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद आरोग्य विभागासाठी जे.सी.बी, पोकलॅड, फरांडी ट्रॅक्टर, साधा ट्रॅक्टर ट्रॉलिसह , रोड रोलर वाहन भाडयाने पुरविणेकामी दाखल दरपत्रके दाखल आहेत.

1) गजानन रामचंद्र निकम
2) कुलदिप कुडंलिक भिंगारदेवे
3) रोहित राजकुमार सुर्यवंशी

उपरोक्त दरपत्रकापैकी रोहित राजकुमार सुर्यवंशी यांचे दरपत्रकातील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराचे दरपत्रक मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा